Email id :- amhri-nagpur@gov.in
Tel. No. : 0712-2714685

# क्षेत्रीय आयुर्वेदीय मातृ एवं शिशु स्वास्थ्य अनुसंधान संस्थान
# REGIONAL AYURVEDA RESEARCH INSTITUTE
## For MOTHER & CHILD HEALTH

(केन्द्रीय आयुर्वेदीय विज्ञान अनुसंधान परिषद, नई दिल्ली द्वारा संचालित
आयुष मंत्रालय, भारत सरकार)
(Under Central Council for Research in Ayurvedic Sciences,
Ministry of AYUSH, Govt. of India)
घरकुल परिसर के पास, एन.आय.टी.कॉम्प्लेक्स, नंदनवन, नागपूर–440 009
Near Gharkul Parisar, N.I.T. Complex, Nandanvan, NAGPUR - 440009

फा.नं. 1-10/2019-20/आरएआरआयएमसीएच-नाग/डायरेक्ट रिकृटमेंट/स्था/1839 दिनांक:

## जहिरात क्र. 01 /2019-20

क्षेत्रीय आयुर्वेदीय मातृ एवं शिशु स्वास्थ्य अनुसंधान संस्थान, घरकुल परिसर, एन.आय.टी. कॉम्प्लेक्स जवळ, नंदनवन, नागपुर, केन्द्रीय आयुर्वेदीय विज्ञान अनुसंधान परिषद् (सी.सी.आर.ए.एस.), आयुष मंत्रालय, भारत सरकार च्या अंतर्गत स्वायत्त संस्थान आहे. संस्थान द्वारा खालील पदांकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अनु.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अनुभव | वयोमर्यादा | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | औषध वितरक (फार्मसिस्ट) ग्रेड-I | 02- दोन (अनारक्षित) | आवश्यक: (अ) डिप्लोमा इन फार्मसी/डी फ़ार्मा (आयु.) मान्यता प्राप्त विश्वविद्यालय आणि 2 वर्षांचा मान्यताप्राप्त संस्थेमधुन अनुभव किंवा बी. फ़ार्मा (आयुर्वेद). | वय 27 वर्षा पेक्षा जास्त नसावे. (भारत सरकार च्या नियमानुसार वयोमर्यादेत योग्य सूट मिळेल.) | 7 व्या वेतन आयोगानुसार 5 श्रेणी + अन्य भत्ते |
| 2. | प्रयोगशाळा परिचारक (लैब अटेंडेंट) | 03-तीन- (अनारक्षित– 03), * 01 पद (पी.डब्ल्यू.डी) अपंगांसाठी राखीव | आवश्यक : (अ) उच्च माध्यमिक विज्ञान शाखा (10+2). (ब) मान्यताप्राप्त संस्था/रुग्णालय/ प्रयोगशाळेमधून 01 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | वय 27 वर्षा पेक्षा जास्त नसावे. (भारत सरकार च्या नियमानुसार वयोमर्यादेत योग्य सूट मिळेल.) | 7 व्या वेतन आयोगानुसार 2 श्रेणी + अन्य भत्ते |
| 3. | चपराशी/ चौकीदार (एम.टी.एस.) | 02-दोन- (ओबीसी – 01, अनारक्षित-01) | आवश्यक : (अ) माध्यमिक (10 वी) मान्यताप्राप्त शिक्षा बोर्ड मधून किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण. | वय 27 वर्षा पेक्षा जास्त नसावे. (भारत सरकार च्या नियमानुसार वयोमर्यादेत योग्य सूट मिळेल.) | 7 व्या वेतन आयोगानुसार प्रथम श्रेणी + अन्य भत्ते |

*** टिप:** एक पद प्रयोगशाळा परिचारक अपंग व्यक्तीसाठी राखीव आहे, ज्यामधे (पी.डब्ल्यू.डी) लोकोमोटर अपंगत्व, सेरेब्रल पाल्सी, कुष्ठ रोग, ड्वारफिस्म, एसिड ग्रस्त, मस्कुलर डिस्ट्रोफी, अंध, कमी दृष्टि, श्रवण अपंगत्व, बौद्धिक अपंगत्व, विशिष्ट शिक्षेची अडचण, मानसिक रोग इत्यादि श्रेणीमध्ये असणारे त्यांची शारीरिक क्षमताची ओळख बसणे, उठणे, चालणे, वाचणे, लिहिणे, बोटांची हालचाल, अंधत्व आणि बधीर या श्रेणी मधील उमेदवार या पदासाठी योग्य आहे.

## सामान्य अटी/नियम:

1. वरील पदे तात्पुरते असून ते सुरु राहण्याची शक्यता आहे आणि नविन निवृत्ति वेतन (न्यू पेंशन स्कीम) योजनेद्वारे उमेदवारांची नियुक्ति करण्यात येईल.

2. निवडलेला उमेदवार हा प्रथम दोन वर्षाच्या परीक्षा काळाकरिता (प्रोबेशन) असेल, जो सक्षम प्राधिकारी च्या निर्णयानुसार वाढवण्यात येईल.

3. हे पद सर्व केन्द्रीय स्तरावर स्थानांतरण करण्यात येईल त्यामुळे उमेदवार परिषद् च्या कोणत्याही संस्थान/केन्द्र/एकक या ठिकाणी सेवा देण्यास ईच्छुक असणे गरजेचे आहे .

4. 01.01.2020 या तारखेपर्यंत उमेदवाराचे वय गणले जाईल. केंद्र सरकारच्या नियमा अनुसार, वयोमर्यादे मधे सूट ही योग्य उमेदवारांना दिली जाईल.

5. आवेदन तारखेच्या अंतिम दिनांका पर्यंत अनुभव गणला जाईल.

6. आवेदन प्राप्ति ची शेवटची तारीख वर्तमान पत्रातील जाहिराती पासून 30 दिवसाच्या आत मानण्यात येईल.

7. उम्मेदवार पूर्वीपासून सरकारी नोकरी करीत असेल तर अश्या उमेदवारने योग्य माध्यमाने आवेदन पत्र (अर्ज) दाखल करावा. अर्ज प्रस्तुत करतांना संस्थान प्रमुखाकडून सत्यापित करून घ्यावे, संस्थान प्रमुखाने हे प्रमाणित केले पाहिजे की अर्जदार प्रशासकीय आणि दक्षता कोनातून मुक्त आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही किंवा कोणतीही दक्षता प्रक्रिया प्रलंबित नाही.

8. विलंबित अर्ज/ अपूर्ण अर्ज नाकारण्यात येईल.

9. लिखित परिक्षेच्या आधारावर उमेदवाराची निवड करण्यात येईल.

10. कोणत्याही उमेदवाराद्वारे किंवा वतीने कोणत्याही स्वरूपात प्रचार करणे किंवा निवडी संदर्भात राजकीय दबाव किंवा इतर बाह्य प्रभाव आणल्यास त्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

11. प्रत्येक पदासाठी उमेदवाराने स्वतंत्र अर्ज भरावा लागेल.

12. रिक्त पदांची संख्या भिन्न आहे.

13. उमेदवाराने परिषदेच्या वेबसाइट www.ccras.nic.in वरुन अर्ज डाऊनलोड करून घ्यावा.

14. अर्ज करतेवेळी दोन सारखे पासपोर्ट आकाराचे फोटो आवश्यक आहेत. एक फोटो अर्जाच्या नमुन्यात निर्दिष्ट जागेवर चिटकवावा आणि दूसरे आवेदन अर्जासोबत जोडावा. योग्य पद्धतीने भरलेला अर्ज **प्रभारी सहायक निदेशक, क्षेत्रीय आयुर्वेदीय मातृ एवं शिशु स्वास्थ्य अनुसंधान संस्थान, घरकुल परिसर, एन.आय.टी., कॉम्प्लेक्स जवळ, नंदनवन, नागपुर-440009** येथे पाठवावे.

15. ओळख पडताळणी : उमेदवारांना लेखी परिक्षेस हजर रहण्यासाठी एक फोटो, नाव असलेले वैध फोटो ओळखपत्र (मुळ आणि एक छायाप्रत) ठेवणे आवश्यक आहे. उमेदवाराची जन्मतारीख जसे की, ईपीआयसी कार्ड, आधार कार्ड, शासनाने परीक्षा केंद्राला दिलेली ओळखपत्र इत्यादि. त्याची फोटो कॉपी सत्यापनाच्य हेतूने संस्थेत ठेवली जाईल.

23/1/2020.

16. भरलेल्या अर्जाच्या तपशीलाच्या आधारावर अर्ज केलेल्या पदांसाठी पात्र असणा-या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलावले जाईल. त्यांची पात्रता/जाती प्रमाणपत्र/जन्मतारीख/अनुभव इ...संबंधित कागदपत्रांची फोटोकॉपी अर्जा सोबत जोडणे आवश्यक नाही. अर्जदाराने दाखल केलेले विवरण/तपशील नियुक्त पत्र देण्यापुर्वी मुळ कागद पत्रासोबत पडताळणी केली जाईल.

17. आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार त्या राखीव प्रवर्गाच्या रिक्त जागांसाठी वयोमर्यादा सवलत दिली जाईल. आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने अनारक्षित पदासाठी अर्ज केला असेल तर त्या उमेदवाराला वयाची सवलत मिळनार नाही तथापी अपंग व्यक्ति (पी.डब्ल्यू.डी) प्रवर्गातिल अर्जदारांना पीब्ल्यूडी आरक्षित राखीव जागा आहेत किंवा नाही याची पर्वा न करता वयोमर्यादेसाठी त्याना सवलत मिळेल. या करिता हे पद पी.डब्ल्यू.डी प्रवर्गासाठी योग्य असतील तर.

18. भारत सरकार चे वेळोवेळी संशोधित केलेली दिनांक 10 एप्रिल 1997 जी.एस.आर. 208(ई) नुसार जम्मू कश्मीर राज्यात 1 जानेवारी 1980 ते 31 डिसेंबर 1989 या कालावधित या राज्यात सामन्यपणे रहिवाशी असलेला उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 5 वर्ष सूट देण्यात यईल विधवा, घटस्फोटीत महिला व न्यायालयीनपणे विभक्त झालेला महिलांना, क्रीडापटु, माजी सैनिक आणि शासनाने ठरविलेल्या इतर श्रेणी भारत सरकार द्वारे वयोमर्यादा मध्ये सवलत दिली जाईल.

19. संस्थान प्रभारी यांना कोणतेही कारण न देता सर्व/ कोणत्याही पदासाठी ची जाहिरात / भरती रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

20. लेखी परिक्षेस उपस्थित राहण्यासाठी उमेदवारांना कोणतेही टी.ए./डी.ए. देण्यात येणार नाही.

अस्वीकरण: उमेदवाराने लक्षात घेतले पाहिजे की केवळ लेखी परीक्षेसाठी हजर राहण्याकरिता प्रवेश पत्र त्याला/ तिला दिले गेले आहे ते म्हणजे उमेदवारी परिषदेने मान्य केली आहे किंवा उमेदवाराने त्याच्या अर्जात नमूद केलेल्या नोंदी परिषदेने ख-या व बरोबर म्हणून मान्य केल्या आहेत असे सूचित होत नाही. उमेदवारांना त्याच्या स्वत:च्या हितासाठी सल्ला देण्यात आला आहे की त्यांनी अर्जामधे चुकिची माहिती भरू नये. उमेदवाराला भरतीची जाहिरात काळजीपूर्वक वाचण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अर्ज करण्यापूर्वी जाहिरातीत नमूद केल्यानुसार पात्रतेचे निकष त्याने पूर्ण केले आहे याची खात्री करून घ्यावी. भर्ती / निवड प्रक्रियेच्या पुढील टप्यात अर्ज भरलेल्या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे सम्पूर्ण भरती / निवड प्रक्रियेतील उमेदवारांची पात्रता म्हणजे 'केवळ तात्पुरते' प्रलंबित पडताळणी आहे.

जर असे दिसून आले की उमेदवार जाहिरातिनुसार पात्रतेचे निकष पूर्ण करत नाही आणि उमेदवाराने दिलेली कोणतीही माहिती खोटी असल्यास किंवा वय, श्रेणी, उपश्रेणी, अर्जाची आवश्यक पात्रता अणि पदांसाठी विहित केलेला अनुभव यासह जाहिरातिमध्ये नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार नाही असे आढळल्यास उमेदवाराची निवड कोणत्याही टप्यावर नाकारली जाईल, नियुक्ति केली गेल्यास रद्द करण्यात येईल.

23/1/2020

प्रभारी सहायक निदेशक (आयु)